DOCUMENT No. 13

Superintendent
Public Trusts Registration Office

# विद्याभारती शैक्षणिक मंडळ

सी.के.नायडू मार्ग, कॅम्प, अमरावती-४४४ ६०२(म.रा.)

रजि.नं.एस.आर.महाराष्ट्र ३२३ : पी.टी.एफ. ४४६

# * सुधारित नियमावली *

## २०१६

Read by
Compared by

सचिव
विद्याभारती शैक्षणिक मंडळ,
अमरावती

# विद्याभारती शैक्षणिक मंडळ

सी.के.नायडू मार्ग, कॅम्प, अमरावती-४४४ ६०२(म.रा.)

(रजि.नं.एस.आर.महाराष्ट्र ३२३ - पी.टी.एफ.४४६)

## सुधारित
## * नियमावली *

विद्याभारती शैक्षणिक मंडळ, अमरावती संस्थेची धर्मदाय आयुक्तांकडे १९७० या वर्षामध्ये नोंदणी करण्यात आली. मागील ४५ वर्षापासून जी घटना अस्तित्वात आहे, त्यामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक असल्याचे आढळून आल्यामुळे व्यवहार सुलभतेकरिता घटनेतील काही कलमांमध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती सुचविण्याचे प्रस्तावित केले आहे. संस्थेच्या प्रत्यक्ष सचिवांकडे सध्याचे घटनेमध्ये जबाबदारी सोपविण्यात आलेली असून ती सक्षमपणे निभवणे आवश्यक आहे. तसेच संस्थेचे उपाध्यक्ष व कोषाध्यक्ष यांचेकडे फारशा जबाबदाऱ्या सोपविण्यात आलेल्या नाहीत. संस्थेचा वाढलेला व्याप, शासकीय नियम व जबाबदाऱ्या पार पाडण्याच्यादृष्टिने पदाधिकाऱ्यांकडे संतुलितपणे जबाबदाऱ्या सोपविणे आवश्यक आहे. या उद्देशाने सध्याच्या घटनेत असलेल्या तरतुदीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा मान्यतेसाठी प्रस्तावित केलेल्या आहेत. कार्यकारी मंडळ व आमसभेने या सुधारणा चर्चा करुन मंजूर करण्याचे प्रस्तावित आहे.

संस्थेचा पत्ता -
विद्याभारती शैक्षणिक मंडळ,
विद्याभारती परिसर, सी.के.नायडू रोड, कॅम्प,
अमरावती. पिन कोड नं.४४४६०२.

संस्थेची ध्येय आणि उद्दिष्टे -

१) महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या तरुणांच्या शिक्षणाची व्यवस्था करणे आणि देशाचे उत्तम नागरिक बनविण्यासाठी प्रकल्प राबविणे व सर्वोत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त करण्यासाठी संस्थेला सतत अग्रेसित करणे.

२) बालक्रिडा, आश्रमशाळा, प्राथमिक व माध्यमिक शाळा, आरोग्य व शेतीविषयक तसेच तांत्रिक व व्यावसायिक उच्च शिक्षणाची महाविद्यालये स्थापित करणे, व्यवसाय व तांत्रिक शिक्षणाच्या सोयीसुविधा उपलब्ध करणे याव्दारे मानवी संसाधन विकास साध्य करण्याच्या दृष्टीने येथील अंशतः ग्रामीण व अंशतः शहरी परिसराला उत्कृष्ट शैक्षणिक सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे.

३) शेतीशाळा, शेतकी महाविद्यालये व त्यांचे विविध अभ्यासक्रम राबविणे व त्याकरिता सोयीसुविधा व प्रकल्प राबविणे.

४) परिसराची निकड लक्षात घेऊन बदलत्या शैक्षणिक परिस्थितीशी सुसंगत, सहजासहजी उपलब्ध नसलेले रोजगाराभिमुख शैक्षणिक अभ्यासक्रम सुरु करणे व त्यासाठी पूर्णतः आत्मनिर्भर, सर्वोत्कृष्ट गुणवत्ताधारक, दर्जेदार शैक्षणिक केंद्रे निर्माण करणे.

५) विद्यार्थी, विद्यार्थिनी, क्रीडा स्पर्धांचे खेळाडूंकरिता क्रीडा वसतिगृहे तसेच व्यवसाय व नोकरदार महिलांकरिता सुरक्षित निवासव्यवस्था असलेली वसतिगृहे चालविणे.

६) ज्ञान, विकास व उपासनेकरिता वाचनालयाच्या सोयीसुविधा उपलब्ध करणे.

७) वैचारिक चळवळीकरिता मासिके किंवा नियतकालिके व पुस्तकांचे प्रकाशन करणे, प्रकाशन संस्था चालविणे, शारीरिक व बौद्धिक समृध्दीसाठी व्याख्यानमाला घेणे, व्यक्तिविकासाची शिबिरे घेणे, नाट्य शिबिरे घेणे, लोककलेची केंद्रे उभारणे, साक्षरता अभियान राबविणे व त्याकरिता आवश्यक साधनसामग्री निर्माण करणे.

८) उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात संशोधन सामग्री निर्माण करणे व संशोधन प्रकल्प राबविणे.

९) देशाच्या विकासामध्ये मौलिक योगदान देणारे सक्षम व सुजाण नागरिक निर्माण करणे व राष्ट्रनिर्मितीमध्ये नीतिमूल्ये जोपासून यथाशक्ती योगदान देऊ शकणारे आदर्श नागरिक घडविणे.

१०) स्वयंशासित व स्वयं अर्थसाहाय्यित विद्यापीठे स्थापन करणे तसेच स्वयंशासित(Autonomous) महाविद्यालये चालविणे.

..... 2.

अध्यक्ष
विद्याभारती शैक्षणिक मंडळ
अमरावती

उपाध्यक्ष

सचिव
विद्याभारती शैक्षणिक मंडळ,
अमरावती

कोषाध्यक्ष
विद्याभारती शैक्षणिक मंडळ
अमरावती

१. प्रस्तावना –
या संस्थेची कार्यपद्धती निश्चित करण्याकरिता खालीलप्रमाणे नियमावली तयार करण्यात आलेली आहे.

२. कार्यक्षेत्र –
या संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य हे राहील.

३. सभासद –
या संस्थेचे सभासद खालीलप्रमाणे राहतील.

१) दोन लाख एकावन्न हजार व त्यापेक्षा जास्त सदस्य शुल्क भरणारे संस्थेचे संस्थापक सदस्य किंवा बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अन्वये नोंदणीकृत न्यास संस्थेला दोन लाख एकावन्न हजार व त्यापेक्षा जास्त देणगी देणारे संस्थेचे नामित प्रतिनिधी. – संस्थेचे विश्वस्त सदस्य

२) एक लाख व त्यापेक्षा जास्त सदस्य शुल्क भरणारे ... – संस्थापक सदस्य

३) एकावन्न हजार व त्यापेक्षा जास्त सदस्य शुल्क भरणारे ... – संरक्षक सदस्य

४) पंचवीस हजार व त्यापेक्षा जास्त सदस्य शुल्क भरणारे ... – आश्रयदाता सदस्य

५) अकरा हजार व त्यापेक्षा जास्त सदस्य शुल्क भरणारे ... – हितचिंतक सदस्य

६) पाच हजार व त्यापेक्षा जास्त सदस्य शुल्क भरणारे ... – सहाय्यक सदस्य

७) संस्थेला स्थावर मालमत्ता ज्याचे मूल्य ११ लाख किंवा त्यापेक्षा जास्त राहील असे सदस्य. ... – आजीव सदस्य

वरील सात गटातील सदस्यांचा संस्थेच्या सदस्यात अंतर्भाव राहील.

४. सदस्यांचा कार्यकाल व अधिकार –
१) वरील कलम ३(१), ३(२), ३(३) व ३(७) मधील सदस्यांचा कार्यकाल आजन्म राहील.
२) आश्रयदाता व हितचिंतक सदस्यांचा कार्यकाल अनुक्रमे पंधरा वर्षे व दहा वर्षाकरिता राहील.
३) सहायक सदस्यांचा कार्यकाल फक्त पाच वर्षाकरिता राहील.
४) केवळ विश्वस्त, संस्थापक, संरक्षक व आजीव सदस्य या नियमावलीत पुढे केलेल्या तरतुदीप्रमाणे संस्थेच्या पदाधिकारी पदाकरिता उमेदवार म्हणून उभे राहू शकतील. कलम ३(४)(५)(६) मधील सदस्यांना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या जागेकरिता उमेदवार होता येणार नाही. तथापि सध्या अस्तित्वात असलेल्या वेगवेगळ्या वर्गवारीतील सदस्यांचा कार्यकाल व सदस्यत्व नियमाप्रमाणे कायम राहील किंवा वाढवता येईल.
५) संस्थेच्या नियमावलीचे, नियमाचे किंवा उपनियमाचे उल्लंघन करणाऱ्या किंवा संस्थेला कोणत्याही प्रकारे हानी पोहचविणाऱ्या कोणत्याही सदस्यास साधारण सभेतील २/३ बहुमताने काढून टाकता येऊ शकेल. परंतु अशा सदस्याविरुद्धचा प्रस्ताव कार्यकारी मंडळाच्या सभेत ३/४(तीन चतुर्थांश) बहुमताने मंजूर केल्यावरच साधारण सभेत चर्चेला येऊ शकेल.
६) साधारण सभेच्या सतत दोन वार्षिक सभेत गैरहजर राहिल्यास कोणत्याही सदस्याची सदस्यता आपोआप रद्द समजल्या जाईल.

......3.

सचिव
विद्याभारती शैक्षणिक मंडळ,
अमरावती

५. साधारण सभा –

१) हिशेबी वर्ष म्हणजे ३१ मार्च संपल्यापासून १२ महिन्याचे आत साधारण सभेचे वार्षिक अधिवेशन/सभा प्रतिवर्षाला घेण्यात येईल.

२) साधारण सभेच्या अधिवेशनाला एकवीस सदस्य किंवा एकूण सदस्य संख्येच्या १/४ यापेक्षा जी संख्या कमी असेल इतक्या सदस्यांची उपस्थिती गणपूर्तीसाठी आवश्यक राहील. कमी उपस्थितीच्या अभावी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी एक तासानंतर घेण्यात येईल. या सभेकरिता आवश्यक गणपूर्तीचे बंधन राहणार नाही.

३) साधारण सभेचे विशेष अधिवेशन सदस्यांच्या लेखी विनंतीवरुन बोलाविले जाईल. परंतु अशी विनंती संस्थेच्या अध्यक्षाच्या नावाने एकवीस किंवा ३/४ इतक्या सदस्यांनी केल्यावरच अशी सभा बोलावली जाईल.

४) साधारण सभेच्या अधिवेशनाची सूचना विषयाचे यादीसह कमीत कमी दहा दिवसांपूर्वी सर्व सदस्यांना लेखी स्वरुपात दिली जाईल.

५) साधारण सभेत सामान्यपणे सर्व प्रश्नांचा निर्णय बहुमताने घेतला जाईल.

६) साधारण सभेमध्ये दर पाच वर्षांनी नवीन कार्यकारी मंडळाची निवड करण्यात येईल.

६. साधारण सभेचे अधिकार –

१) हिशेब निरिक्षकाव्दारे तपासलेले व कार्यकारी मंडळाकडून प्रस्तुत केलेले आयव्यय, हिशेबपत्रके व वार्षिक अहवाल मंजूर करणे.

२) पुढील वर्षाच्या आयव्यय पत्रकास मंजुरी देणे.

३) दर पाच वर्षाच्या कालावधीकरिता कार्यकारी मंडळाची निवड करणे किंवा पूर्वीच्या कार्यकारी मंडळाचा पाच किंवा त्यापेक्षा अधीक मुदतीसाठी कार्यकाल वाढविणे.

४) साधारण सभेच्या अधिवेशनाच्या सभेच्या तीन दिवस आधी संस्थेच्या कोणत्याही सभासदाने लेखी प्रस्तुत केलेल्या ठरावावर विचार करणे. तसेच कार्यालयातर्फे अध्यक्षांच्या अनुमतीने प्रस्तुत केलेले ठराव विचारात घेऊन पारित केले जातील.

७. कार्यकारी मंडळाची रचना व निवडणुकीचे नियम –

१) संस्थेचे कार्यकारी मंडळ हे एकूण तेरा सदस्यांचे राहील. यामध्ये अध्यक्ष–१, उपाध्यक्ष–१, सचिव–१, खजिनदार–१ व ९ कार्यकारी सदस्यांचे कार्यकारी मंडळ निवडण्यात येईल.

२) कलम क्रमांक ३(३)(४)(५) व (६) प्रमाणे सदस्य होऊन कमीत कमी दोन वर्ष पूर्ण झाले आहे अशा सदस्यांना कार्यकारी मंडळात खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व राहील.

३) संस्थेचे अध्यक्ष हे विश्वस्त या सदस्य वर्गवारी मधून आणि उपाध्यक्ष व खजिनदार हे संस्थापक व संरक्षक सदस्य वर्गवारी मधून निवडले जातील. तसेच प्रत्येकी १–१ कार्यकारी सदस्य, संरक्षक, आश्रयदाता, हितचिंतक आणि सहायक सदस्यांमधून निवडल्या जातील. संस्थेचे सचिव पदाकरिता निवडून आलेले निर्वाचित अध्यक्ष हे इतर निर्वाचित कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांशी चर्चा व विचारविनिमय करुन सचिवाची निवड करतील. अशी निवड करतांना ही व्यक्ती संस्थेची कोणत्याही वर्गवारीतील सदस्य होऊन कमीत कमी २ वर्षे पूर्ण झालेली असावी. संस्थेच्या निर्वाचित अध्यक्षांना अशी निवड करण्याचे अधिकार असतील.

त्याचप्रमाणे पाच कार्यकारी सदस्य हे संस्थेव्दारा संचालित महाविद्यालयाच्या प्राचार्यांपैकी एक, शाळेच्या मुख्याध्यापकांपैकी एक तसेच संस्थेव्दारा संचालित अन्य संस्था प्रमुखांपैकी एक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांपैकी एक व शिक्षणतज्ञ एक असे एकूण पाच कार्यकारी सदस्य संस्थेच्या अध्यक्षांतर्फे नियुक्त करण्यात येतील.

अध्यक्ष यांची विश्वस्त सदस्यांतर्फे तसेच उपाध्यक्ष व कोषाध्यक्ष यांची संस्थापक व संरक्षक सदस्यांतर्फे आमसभेपुर्वी स्वतंत्रपणे सभा घेऊन त्यांच्या वर्गवारीतून निवड करण्यात येईल आणि इतर चार कार्यकारी सदस्य वर नमूद केल्याप्रमाणे आमसभेतून त्या त्या वर्गवारीमधून निवडल्या जातील.

परंतु जर पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीसाठी वरीलप्रमाणे उमेदवारी अर्ज सादर न झाल्यास विश्वस्त, संस्थापक व संरक्षक या तिन्ही कॅटेगिरीमधून अध्यक्ष, उपाध्यक्ष व कोषाध्यक्ष या पदासाठी वरील तीनही श्रेणीतून कोणीही सदस्य उमेदवारी अर्ज दाखल करु शकेल व या तीनही श्रेणीतील सर्व सदस्य स्वतंत्रपणे मतदान करुन अध्यक्ष, उपाध्यक्ष व कोषाध्यक्ष पदांचे उमेदवार निवडून देतील.

.....4.

उपाध्यक्ष

सचिव
विदर्भ ... शैक्षणिक मंडळ,
अमरावती.

सदस्य
विदर्भ ... शैक्षणिक ...

८. कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व अधिकार –

१) कार्यकारी मंडळाचा कार्यकाल पाच वर्षाचा राहील पण पुढील निवडणूक होईपर्यंत पूर्वीचे कार्यकारी मंडळ कार्य करीत राहील.

२) अध्यक्षांचा किंवा पदाधिकाऱ्यांचा कार्यकाल त्या कार्यकारी मंडळाबरोबरच संपेल.

३) कार्यकारी मंडळाची सभा वर्षातून कमीत कमी तीन वेळा व प्रत्येक चार महिन्यातून एकदा भरणे आवश्यक राहील.

४) कार्यकारी मंडळाच्या सभेला पाच सदस्यांची उपस्थिती आवश्यक राहील. कमी उपस्थितीमुळे स्थगित झालेली सभा त्याच ठिकाणी एक तासानंतर भरेल व स्थगित सभेला आवश्यक उपस्थितीचे बंधन राहणार नाही.

५) कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना पाच दिवसांपूर्वी दिली जाईल. सभासदांना अशाप्रकारे पूर्वसूचना न देता देखिलही सभा बोलावण्याचा अधिकार संस्थेच्या अध्यक्षांना राहील.

६) कार्यकारी मंडळातील एखादी जागा कोणत्याही कारणाने रिकामी झाल्यास रिकाम्या जागेवर बहुमताने कार्यकारी मंडळ पहिल्या ३(१)(२)(३) या सभासदांमधून कोणासही कार्यकारी मंडळावर सभासद म्हणून घेऊ शकेल.

७) कलम क्रमांक ३(३)(४)(५)(६) पैकी एकात किंवा कोणत्याही प्रकारात एकही सभासद निवडून आलेला नसेल तर त्याप्रकारच्या सदस्यातून कार्यकारी मंडळावर जो सभासद निवडून द्यावयाचा आहे तो सभासद दुसऱ्या कोणत्याही सदस्य प्रकारातून घेण्याचा अधिकार अध्यक्षांना राहील.

८) कार्यकारी मंडळ प्रत्येक आर्थिक वर्षारंभापूर्वी पुढील वर्षाचे अनुमानित आयव्यय पत्रक/बजेट निश्चित करेल. त्याचप्रमाणे संस्थेचे ऑडिटेड हिशेब आमसभेत मंजूर करतील.

९) संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे निवडणुकीकरिता निवडणूक अधिकारी नेमल्या जाईल. निवडणुकीची पद्धती व कार्यवाही घटनेतील नियमानुसार करण्यात येईल. अध्यक्षांनी सूचविलेल्या निवडणूक अधिकाऱ्याची कार्यकारी मंडळातर्फे मान्यता घेण्यात येईल.

१०) संस्थेच्या सर्व प्रकारच्या चल व अचल संपत्तीवर कार्यकारी मंडळाचे प्रत्यक्ष नियंत्रण राहील. अध्यक्ष आणि सचिव कार्यकारी मंडळास उत्तरदायी राहून संस्थेच्या संपत्तीचे संरक्षण व संवर्धन करतील.

११) संस्थेच्या सर्व वर्गवारीचे सदस्यत्व बहाल करण्यासाठी इच्छूकाला मा.अध्यक्षांकडे निर्धारित नमुन्यामध्ये प्रस्तावित सदस्य शुल्क भरुन अर्ज करावा लागेल व असा अर्ज कार्यकारी सभेमध्ये बहुमताने स्वीकारल्यानंतरच इच्छूकाला संस्थेचे सदस्यत्व बहाल करता येईल. परंतु कार्यकारिणीला कोणतेही कारण न देता संबंधिताचा अर्ज नामंजूर करण्याचा अधिकार राहील.

९. कार्यकारी मंडळाचे कार्यक्षेत्र (अधिकार)–

१) संस्थेची व संस्थेव्दारा संचालित सर्व संस्थांची चांगल्याप्रकारे व्यवस्था ठेवणे.

२) विद्यावेतनाकरिता अर्ज स्वीकारणे व विद्यावेतन देणे.

३) शिक्षण प्रसाराकरिता नवीन विद्यालये, महाविद्यालये, वाचनालये, व्यायामशाळा, संस्कारशाळा, कृषिसंस्था, इत्यादी छोटयामोठ्या संस्था छात्रालयासहीत चालविणे.

४) कार्यकारी मंडळाने केलेल्या कार्याचे विवरण व वार्षिक अहवाल साधारण सभेपुढे मंजुरीकरिता ठेवणे.

५) साधारण सभा बोलाविणे, सभेची तारीख निश्चित करणे व सभेची विषयसूची तयार करणे.

६) नवीन सदस्य संख्या वाढविणे, भांडवल व संस्थेची आर्थिक व्यवस्था दृढ करण्याकरिता देणग्या उभारणे किंवा त्यादृष्टिने कार्यक्रम आखणे.

७) संस्थेच्या उद्देशांची पूर्ती करण्याकरिता अन्य व्यक्तींची तसेच संस्थांची मदत व सहकार्य मिळविणे.

८) संस्थेवर झालेल्या कायदेविषयक कार्यवाहीची सर्वप्रकारे बचाव व्यवस्था करणे.

९) संस्थेचे सर्व स्तरावरील कार्य सुव्यवस्थित चालविण्याकरिता पगारी, विनपगारी, निमपगारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे व त्यांच्या सेवेसंबंधी नियम ठरविणे.

.....5.

उपाध्यक्ष

सचिव
विद्याभारती शैक्षणिक मंडळ,
अमरावती

१३. कोषाध्यक्ष -

१) दर पाच वर्षांनी साधारण सभेत निवडून आलेले कार्यकारी मंडळ आपल्या पहिल्या सभेत कोषाध्यक्षाच्या (खजिनदार) निवडीस मान्यता देतील.

२) कोषाध्यक्ष संस्थेच्या उत्पन्नावर व खर्चावर देखरेख करतील.

३) अध्यक्ष व सचिवाच्या मदतीने वार्षिक हिशेब तयार करुन घेतील आणि बजेट बाबत सूचना देतील.

४) वार्षिक हिशेब तयार करुन ते कार्यकारी मंडळ व साधारण सभेत मांडणे.

५) संचालित संस्थांचे मासिक, त्रैमासिक आर्थिक अहवाल, संस्थेच्या अंतर्गत हिशोब तपासणीकाच्या मदतीने पडताळणे व अध्यक्ष, सचिवांना माहिती देणे.

१४. हिशेब -

१) संस्थेचे आर्थिक वर्ष १ एप्रिल ते पुढील ३१ मार्च असे राहील.

२) संस्थेचे सर्व हिशेब अध्यक्ष व सचिवाच्या देखरेखीखाली राहील. प्रत्येक सदस्यास संस्थेचा हिशेब पाहण्याचा पूर्ण अधिकार राहील.

३) वर्ष अखेर संस्थेचे हिशेब लवकरात लवकर पूर्ण करुन ते नियमाप्रमाणे तपासनिसाकडून तपासून घेतले जातील व मगच साधारण सभेसमोर ठेवण्यात येतील.

४) संस्थेच्या दैनंदिन व्यवहाराकरिता अध्यक्ष अथवा सचिव जास्तीत जास्त रुपये ५०,०००/-(पन्नास हजार रुपये) आपल्या जवळ ठेवू शकतील. बाकी रक्कम संस्थेच्या नावाने कार्यकारी मंडळाने ठरविल्याप्रमाणे बँकेत ठेवली जाईल.

५) संस्थेच्या नावाने उघडण्यात येणारे बँकेतील खाते अध्यक्ष (आवश्यक) आणि कोषाध्यक्ष किंवा सचिव यापैकी एक असे दोघांच्या संयुक्त सहीने चालविण्यात येईल.

६) संस्थेव्दारा संचालित संस्थेतील बँकेचे खाते संचालित संस्थेचे प्रमुख(प्राचार्य किंवा मुख्याध्यापक किंवा अधिक्षक(वसतिगृह)(आवश्यक) आणि अध्यक्ष किंवा सचिव किंवा कोषाध्यक्ष यापैकी प्रत्येकी एक असे दोघांच्या संयुक्त सहीने चालविण्यात येईल. तथापि असे खाते चालविण्याबाबत अनुदान मिळालेल्या प्राधिकारिणीचे नियमानुसार संस्था प्रमुख यांना किंवा त्यांचे निर्देशाप्रमाणे बँकेतील खाते चालविण्याचा अधिकार राहील.

१५. संशोधन -

१) कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव या संस्थेच्या नावात कोणत्याही प्रकारचा फेरबदल करता येणार नाही.

२) कलम १४(१) प्रमाणे नावा व्यतिरिक्त नियमावलीत किंवा नियमात कोणतेही बदल करणे, सुधार करणे, संक्षिप्त वा विस्तार करणे अथवा बदलणे अथवा एखादा उपनियम वा नियम काढून टाकणे किंवा जास्तीचा टाकणे इत्यादीबाबतचे प्रश्न कार्यकारी मंडळाच्या एकूण संख्येच्या ३/४(तीन चतुर्थांश) बहुमताने मंजूर केल्यावर साधारण सभेसमोर उपस्थित केले जातील. साधारण सभेत उपस्थितांच्या २/३(दोन तृतीयांश) बहुमताने असा ठराव मंजूर झाला तर तो तावडतोब अंमलात आणल्या जाईल.

.....7.

उपाध्यक्ष

सचिव
विद्याभारती शैक्षणिक मंडळ,
अमरावती.

**विसर्जन –**

**१)** कोणत्याही कारणास्तव संस्थेचे विसर्जन झाल्यास संस्थेची मालमत्ता सदस्यात विभागली जाणार नाही.

**२)** अशा परिस्थितीत विशेष साधारण सभा स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकेल. असा निर्णय एकूण सदस्य संख्येच्या ३/४(तीन चतुर्थांश) व्हावा लागेल. अशा निर्णयाची प्रत मे.चॅरिटी कमिशनर साहेबांना १५ दिवसात पाठविण्यात येईल.

– दाखला –

प्रमाणित करण्यात येते की, विद्याभारती शैक्षणिक मंडळ, अमरावती या संस्थेच्या सुधारित नियमावलीची ही **सत्यप्रत** आहे.

| अ.क्र. | नांव | पद | सही |
|---|---|---|---|
| ०१) | श्री.रावसाहेब शेखावत | अध्यक्ष | |
| ०२) | श्री.बी.एल.शेखावत | सचिव | |
| ०३) | श्री.डॉ.के.एन.पाटील | उपाध्यक्ष | |

***

Copyed with or by........
Read by........
Compared by........

Superintendent
Public Trusts Registration Office
Amravati

सचिव
विद्याभारती शैक्षणिक मंडळ,
अमरावती